MHJN080014782023

**निशाणी क्र.२० खालील आदेश**
(पारीत दिनांक ०९/०४/२०२६)

वादी यांनी सदरचा अर्ज आदेश ३९ नियम ०१ व ०२ दिवाणी प्रक्रिया संहिता अंतर्गत प्रतिवादी यांचेविरुध्द तात्पुरत्या मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल केला आहे.

०२. वादीने दावा हा वादी मालक असल्याची घोषणा व शाश्वत मनाई हुकुम मिळणेबाबत केलेला आहे. वादी यांच्या अर्जातील कथन पुढीलप्रमाणे :-

मौजे घोन्सी तांडा नं.२, ता. घनसावंगी, जि. जालना येथील शेतजमीन क्र.१२८ मधील एकुण क्षेत्रफळ ६४ हे. ९२ आर पैकी ०२ हे. (येथुन पुढे **दावा मिळकत** असे संबोधण्यात येईल) ज्याची चतुःर्सिमा खालीलप्रमाणे -

पुर्वेस - रस्ता व नागोराव रामभाऊ आव्हाड यांची जमीन,
पश्चिमेस – रोड,
दक्षिणेस - भागुजी सखाराम आव्हाड यांची जमीन व
उत्तरेस – आण्णा गुलाब आव्हाड यांची जमीन.

०३. वादींचे थोडक्यात कथन की, प्रतिवादी क्र.१ वादीचा भाऊ असुन प्रतिवादी क्र.२ चुलती आहे व प्रतिवादी क्र.३ ते ५ हे वादीचे पुतणे आहेत. दावामिळकत ही वादीचे चुलते नाते विठ्ठल सखाराम आव्हाड यांच्या नावे असुन ते दि.२५/१०/२०२१ रोजी मयत झाले आहेत. त्यांच्या हयातीमध्ये दावामिळकतीचे नोंदणीकृत मृत्युपत्र (ईच्छापत्र) नोंदणी क्र.२४६८/२०१९ दि.१८/११/२०१९ रोजी वादी यांच्या नावाने लिहुन ठेवले होते. त्यावर प्रतिवादी क्र.२ यांचे साक्षीदार म्हणुन मृत्युपत्रावर अंगठा आहे. प्रतिवादी क्र.२ ही मयत विठ्ठल सखाराम आव्हाड यांची पत्नी आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचा दावामिळकतीवर कोणताही हक्क संबंध नाही. सदर मृत्युपत्राआधारे दावामिळकतीचे फेर ओढुन घेण्याचे कार्यवाही संबंधीत अधिकाऱ्याकडे सुरु आहे.

०४. वादी पुढे असे कथन करतात की, दावा मिळकतीचे मेहनत व मशागत करुन ते स्वता:चे व कुटुंबाचे उदरनिर्वाह भागवितात. प्रतिवादी क्र.१ यांच्या मनात सदर दावामिळकतबाबत लालच निर्माण झाल्यामुळे प्रतिवादी क्र.२ व ईतर प्रतिवादी यांना हाताशी धरुन अर्जदारास त्रास देण्यास सुरुवात केली. दि.२७/०९/२०२३ रोजी वादीची पत्नी दावामिळकती मध्ये जळीतासाठी जमा करुन ठेवलेली लाकडे आणण्यासाठी गेली असता प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी ती लाकडे जाळुन टाकले. त्यामुळे वादीचे वीस हजार रक्कम रुपयचे नुकसान झाले. त्याबाबत वादीने घनसावंगी पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविली आहे. ज्याचा एमसीआर नं.७८४/२०२३ असा आहे. सदर तक्रारीवरुन पोलीसांनी प्रतिवादीविरुध्द कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे त्यांचे धैर्य वाढले असुन दि.२७/१०/२०२३ रोजी दावामिळकतीमध्ये वादी ट्रकच्या सहाय्याने पेरणी पुर्व मशागत करत असताना प्रतिवादी तेथे आले व वादीस मारहाण करण्याच्या धमक्या देवुन दावा मिळकतीमधुन काढण्याचा प्रयत्न करु लागले. शेवटी दि.२३/०६/२०२४ रोजी वादी हे शेतामध्ये मशागतीकरीता गेले असता प्रतिवादी यांनी शेतातील पिकांची नासधुस केली व वादीस धमक्या दिल्या की, ‘तुझे हातपाय तोडल्या शिवाय तु ऐकणार नाही, तुला हजार वेळेस सांगितले की, तु शेतामध्ये येवु नकोस तुझे हातपाय तोडुन फेकुन देवु.' सदरची तक्रार घनसावंगी पोलीस स्टेशन येथे देण्यास गेल्यास पोलीसांनी सदर प्रकरण दिवाणी स्वरुपाचे असुन योग्य तो न्यायालयात दाद मागावी, अशी समज वादीस दिल्यामुळे सदरचे प्रकरण दाखल करण्याचे कारण उद्भवले आहे.

०५. वादी हे दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत. मयत विठ्ठल सखाराम आव्हाड हे हयात असल्यापासुन जमीनीचा ताबा हा वादीकडे आहे. सदर दावा मिळकत मयत विठ्ठल सखाराम आव्हाडने वादीस दिल्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ५ हे वादीच्या ताबा वहिवटीमध्ये हरकत व अडथळा निर्माण होत आहे. वादी पुढे असे कथन करतात की, वादीने त्याची बाजु प्रथमदर्शनी सिध्द केलेली असुन न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे, त्यामुळे दावा निकाली लागेपर्यंत वादीच्या ताब्यात व वहिवटीस प्रतिवादीने अडथळा करु नये, म्हणुन तात्पुरता मनाई हुकुम आदेश पारीत करावा, ही विनंती केली.

०६. प्रतिवादी यांनी लेखी कैफियत नि.क्र.१४ प्रमाणे दाखल केली आहे. त्यांनी नि.क्र.२० वर स्वतंत्र लेखी म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे नि.क्र.१४ वरील लेखी निवेदन येथे मी नि.क्र.२० वरील अर्ज निकाली काढत असताना चावत आहे. वादीने संपुर्ण कथन नाकारले व कथन केले की, वादीचे मालकी व कब्जा दोन्ही नाकारले असुन प्रतिवादी क्र.२ ही मयत विठ्ठल सखाराम आव्हाड यांची एकमेव वारस असल्याचे सांगितले व सदरचे मृत्युपत्र हे तिच्याशी संबंधीत नाही कारण ती असुक्षितीत आहे. तिला मृत्युपत्राबद्दल कसलीही माहिती नाही. त्यामुळे सदरचे मृत्युपत्र प्रतिवादी क्र.२ ही नाकारते. दावा मिळकतीवर प्रतिवादी क्र.२ चा उदरनिर्वाह चालतो. अशा वेळेस सदर मनाई हुकुम वादीच्या हक्कास दिल्यास प्रतिवादी क्र.२ वर उपासमारीची वेळ येईल. वादी यांचा सदर मिळकतीवर कोणताही अधिकार नसल्याचे कथन केले व तसेच सदर दावा मिळकत ही वर्ग-२ मधील असल्यामुळे मयत विठ्ठल सखाराम आव्हाड यास मृत्युपत्र करण्याचा अधिकार नाही. त्यामुळे नोंदणीकृत मृत्युपत्र हे मुळातच कायदेशीर नाही. वादीने मयत विठ्ठल यांना कोणतेही वारस नसल्याचे खोटे दाखवून खोटे वारसप्रमाणपत्र सदरची मालमत्ता गिळंकृत करण्याकरिता मिळविले आहे. वादी हा न्यायालयासमोर स्वच्छ हाताने न आल्याने सदरचा दावा कोर्ट खर्चासह फेटाळण्यात यावा.

०७. वादींतर्फे विधीज्ञ श्री. व्ही के. तांदळे यांचा युक्तीवाद ऐकला व प्रतिवादींतर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. कुलकर्णी यांचे नि.क्र.१४ वरील लेखी कैफीयत लक्षात घेतली. वादींनी दाखल केलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. माझे विचारार्थ खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष कारणांसहित नमुद केलेले आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१ | वादींच्या बाजुने प्रथमदर्शनी केस आहे का ? | नकारार्थी. |
| ०२ | न्यायाचा समतोल वादींच्या बाजुने आहे का ? | नकारार्थी. |
| ०३ | मनाई हुकुमाचा अर्ज मंजुर न केल्यास वादीचे न भरून येणारे नुकसान होणार आहे का ? | नकारार्थी. |
| ०४ | काय आदेश ? | अर्ज नामंजुर |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

०८. वादींनी दाखल केलेले कागदपत्रे खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | कागदपत्र | स्वरुप |
|---|---|---|
| १ | नोंदणीकृत इच्छापत्र नोंदणी क्र.२४६८ ची प्रत, | झेरॉक्स |
| २ | वारस प्रमाणपत्र, | झेरॉक्स |
| ३ | पोलीस अधिक्षक, जालना येथे वादीच्या पत्नीने दिलेले तक्रारी अर्ज. | झेरॉक्स |

०९. प्रतिवादींनी एकही दस्त दाखल केला नाही.

**मुद्दे क्रमांक १ ते ३ करीता :-**

तिन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेकरीता एकत्र घेतलेले आहेत.

१०. वादींच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, मयत वादीचे चुलते नामे विठ्ठल सखाराम आव्हाड यांच्या नावे दावा मिळकत असून ती दावा मिळकत त्यांनी वादीच्या नावे मृत्युपत्राआधारे (Will) लिहून ठेवली होती. सदर मृत्युपत्रावर राधाबाई विठ्ठल आव्हाड यांची पत्नी म्हणून साक्षीदार आहे व तिचा निशाणी अंगठा आहे. सदर नोंदणीकृत मृत्युपत्र क्र.२४६८/२०१९ असा असून दि.१८.११.२०१९ रोजी नोंदणीकृत केलेला आहे. तेव्हापासून वादी हा सदर दावा मिळकतीचा जमीनीचा मालक असून प्रतिवादी यांचे सदर वाद मिळकतीशी काहीही संबंध नाही. प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी काहीही संबंध नसताना वादीच्या सदर वाद मिळकतीच्या मालकी व ताब्यात हरकत व अडथळा निर्माण करत आहे व वादीला मारहाण करून सदर वाद मिळकतीमधून बेदखल करण्याच्या धमक्या देत आहे. त्यामुळे वादीला सदर दाव्याचा निकाल लागेपर्यंत दावा मिळकतीच्या मालकी व ताब्यास हरकत अडथळा करू नये असा तात्पुरता मनाई आदेश वादीच्या हक्कात देण्याची विनंती केली.

११. याउलट प्रतिवादी यांनी युक्तीवाद केला की, सदर दावा मिळकत ही वर्ग-२

मध्ये मोडत असून मयत विठ्ठल सखाराम आव्हाड यांना सदरचे मृत्युपत्र वादीच्या हक्कात लिहून ठेवण्याचा कोणताही हक्कत प्राप्त होत नाही. मयत विठ्ठल आव्हाड यांची एकमेव कायदेशीर वारस प्रतिवादी क्र.२ ही आहे. वादीने सदर दावा मिळकतीचा ताबा हा त्याच्याकडे असल्याबाततचा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. प्रतिवादीने वादीचा ताबा नाकारलेला आहे. त्याकरिता वादीने प्रथमदर्शनी हे दाखवून देणे गरजेचे आहे की, दावा मिळकतीचा ताबा वादीकडे आहे. तसेच वादीने दाखल केलेले न्यायनिवाडे तात्पुरता मनाई आदेशचा अर्ज निकाली काढताना लक्षात घेता येणार नाहीत. कारण सदरचे न्यायनिवाडे हे अभिलेखावर पुरावा आल्यानंतर अंतिम निर्णयाच्या वेळी लक्षात घेता येतील. वादीने त्याची केस प्रथमदर्शनी सिध्द केलेली नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

११. दोन्ही बाजुचे विधीज्ञांचा युक्तीवाद लक्षात घेतले व अभिलेखावर दाखल केलेले नोंदणीकृत मृत्युपत्र क्र.२४६८/२०१९ अवलोकन केले. यावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, वादीचे चुलते मयत विठ्ठल सखाराम आव्हाड यांनी दि.१८/११/२०१९ रोजी वादी यांच्या नावावर इच्छापत्र लिहुन ठेवले होते. त्यामध्ये मयत विठ्ठल सखाराम आव्हाडने स्पष्ट नमुद केले आहे की, त्यांच्या मृत्युनंतर त्यांच्या नातेवाईकामध्ये आपआपसात वाद, भांडण, तंटा होवु नये म्हणुन हयातीमध्ये इच्छापत्र तयार केले आहे. त्यांना स्वता: चा मुलगा व मुलगी होते, परंतु मुलीचा मृत्यु झाला असुन मुलगा कोठे आहे, याची माहिती नाही. त्यांचा व त्यांच्या पत्नीचा सांभाळ वादी नामे सर्जेराव हे करत आहेत. त्यामुळे त्यांच्या नावे असलेली ०२ हेक्टर क्षेत्र वादी यांच्या हक्कात सदरचे मृत्युपत्र लिहुन ठेवत आहे, असे कथन केलेले आहे. सदर मृत्युपत्रातील नमुद चतु:सिमा व दाव्यात नमुद चतु:सिमा ह्या एकच आहेत.

१२. प्रतिवादीच्या कथनानुसार सदर दावा मिळकत ही वर्ग-२ मध्ये मोडत आहे, असे कथन आहे. यावरून मी ७/१२ उताराचे अवलोकन केले. त्यामध्ये असे दिसून येते की, सदर दावा मिळकत ही वर्ग-२ मध्ये मोडत होती. आता प्रश्न उपस्थित होतो की, मयत विठ्ठल सखाराम आव्हाड यांना दावा मिळकतीचे इच्छापत्र करून ठेवण्याचे अधिकार होते का

किंवा ते सदर दावा मिळकतीचे संपुर्णपणे मालक (Absolute owner) होते का, त्यांना दावा मिळकतीचे हस्तांतर करण्याचे अधिकार होते का ? सदर अभिलेखावर फेरफार क्र.७८ वादीने दाखल केलेला असून त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर दावा मिळकत ही वर्ग-२ मध्ये मोडत असून मयत विठ्ठल सखाराम आव्हाड यांना सदर मालमत्तेची विल्हेवाट मा. जिल्हाधिकारी यांची परवानगी घेतल्याशिवाय करता येणार नाही, असे कायद्याचे तत्व आहे. परंतू वादीने त्यांच्या कथनाला पुष्ठ्यर्थ मिळण्याकरिता **सखाराम श्रावण भिसे वि. रमेश धन्नु राठोड, २०१८ (७) ऑल.एम.आर. ७८९ च्या माननीय उच्च न्यायालय खंडपीठ नागपुर** यांच्या न्यायनिवाड्याचा आधार घेतला आहे. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने असे सांगितले आहे की, मालमत्ता हस्तांतरण कलम ५ मधील हस्तांतराच्या संकल्पनेच्या अनुरोधाने (Anology) महाराष्ट्र महसुल संहितेच्या कलम २९ (३) (अ) मधील हस्तांतर या शब्दाचा अर्थ लावण्यासाठी मृत्युपत्राआधारे केलेले हस्तांतर हे टेस्टामेंटरी डिसपोजीशन असल्याने ते हस्तांतर मानले जाणार नाही. परिणामी, कलम २९ (३) (अ) मधील निर्बंध मृत्युपत्राआधारे होणाऱ्या हस्तांतरास लागु होत नाही.

१३. वादीने **मेटपल्ली लासुमबाई (मयत) व इतर वि. मेटपल्ली मुतेह (मयत) मार्फत कायदेशीर वारस, दिवाणी अपील क्र.५९२१/२०१५, निर्णय दि.२१.०७.२०२५** या न्यायनिवाड्यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे सांगितले आहे की, सदर नोंदणीकृत मृत्युपत्र प्रामाणिकतेचा (genuiness)कायदेशीर अनुमान लाभत असल्याामने त्या मृत्युपत्राच्या सत्यतेबाबत शंका उपस्थित करणाऱ्या पक्षावर त्या अविश्वसनियता सिध्द करण्याचा पुराव्याचा भार राहातो. वादीने मृत्युपत्राआधारे त्याची मालकी घोषित करावी अशी मागणी केली आहे. प्रतिवादीने मृत्युपत्र हे आव्हानित केले आहे, म्हणजेच वादी ज्या आधारे मालकी घोषीत करण्याची मागणी करत आहे, तो वादातीत असुन वादीची मालकी मृत्युपत्राआधारे आहे हे गुणवत्तेवर दोन्ही बाजुचा पुरावा आल्यानंतर सिध्द करता येईल. त्यामुळे दोन्ही न्यायनिवाडे हे अंतिम न्यायनिर्णयाच्या वेळी लक्षात घेता येतील.

१४. वादीची मालकी ही गुणवत्तेवर निकाली काढण्याकरिता राखुन ठेवण्यात

आल्यामुळे आता तात्पुरता मनाई अर्जावर आदेश करत असताना फक्त हे पाहणे आवश्यक आहे की, वादीचा दावा मिळकतीवर ताबा आहे किंवा कसे. त्याकरिता मी अभिलेखाचे अवलोकन केले, वादीने अभिलेखावर फक्त नोंदणीकृत मृत्युपत्र दाखल केले आहे. या व्यतिरिक्त सदर दावा मिळकतीवर त्याचा ताबा असल्याचा कोणताही कागद वा लगत शेतकऱ्यांचे शपथपत्र दाखल केले नाहीत. याउपरोक्त विठ्ठल मयत झाल्यानंतरही वादीने सदर मृत्युपत्राआधारे दावा मिळकतीच्या ७/१२ मध्ये नोंद घेतली नाही. वारसाहक्काने दावा मिळकतीवर एकमेव वारस असल्याने त्याची नोंद मालकी रकान्यात घेण्याकरिता गेले असता तलाठ्याने वारस प्रमाणपत्र मागितले. वादी असे कोठेच कथन करत नाही की, वादीने त्याचे नाव दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्याच्या मालकी रकान्यात मृत्युपत्राआधारे वादीचे नाव घेण्याकरिता तलाठ्याकडे अर्ज दिला होता. ही बाब वादीने त्याच्या दाव्यात का कथन केली नाही किंवा मृत्युपत्राआधारे नोंद घ्यावी याकरिता अर्ज दिला नाही, याबाबत साशंकता निर्माण होते. वादीने सदरचे वारसप्रमाणपत्र दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१९२/२०२२ अभिलेखावर दाखल केले आहे. परंतू, प्रतिवादी यांनी त्या वारस प्रमाणपत्रास आक्षेप घेतलेला आहे. तो आक्षेप अर्ज सदर न्यायालयात आजरोजी प्रलंबित आहे. सदर वारस प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रतिवादी क्र.२ हयात असताना मयत विठ्ठल यांना वादी व्यतिरिक्त कोणतेही वारस नाहीत असे दाखवून वारस प्रमाणपत्र घेतल्याचे दिसून येते.

१५. वादीने त्याच्या दाव्यात असे कथन केले आहे की, दि.१०.०६.२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१ ते ५ हे दावा मिळकतीमध्ये आले व वादींना धक्काबुक्की केली व जमीनीतुन बेदखल करण्याची धमकी दिली. त्यामुळे वादीला मानसिक धक्का बसला. त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र ग्रामीण येथे उपचाराकरिता दाखल केले. त्यानंतर वादी हे पुन्हा दि.२६.०६.२०२४ रोजी शेतामध्ये मशागतीकरिता गेले असता प्रतिवादी यांना शेताची नासदुस केली व वादीस म्हणाले की, तुझे हात पाय तोडल्याशिवाय तु एकणार नाहीस, तुला हजार वेळेस सांगितले की, शेतात येऊ नकोस अन्यथ तुझे हात पाय तोडुन फेकुन देऊ.

यावर वादीने घनसावंगी पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यासाठी गेले असता पोलीसांनी त्यांना दिवाणी दावा दाखल करण्यास सांगितले. या कथनास पुष्ठी मिळण्याकरिता वादीने तो अर्ज अभिलेखावर दाखल केला नाही. तसेच वादीने दि.२८.१०.२०२३ रोजी पोलीस स्टेशन घनसावंगी येथे प्रतिवादींविरुध्द त्यांनी जळीताचे लाकडे जाळुन रू.२०,०००/- चे नुकसान केले त्याचा एन.सी.आर. क्र.७८४/२०२३ असा आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीने सदरची एन.सी. अभिलेखावर दाखल केली नाही. याउपरोक्त वादीने अभिलेखावर मयत विठ्ठल सखाराम आव्हाड यांनी करुन दिलेले मृत्युपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये असे कोठेही नमुद नाही की, वादीला मयत विठ्ठल यांनी त्यांच्या हयातीमध्ये दावा मिळकतीचा ताबा दिला होता. याउलट सदर मृत्युपत्रामध्ये असे नमुद आहे की, विठ्ठल हे हयात असेपर्यंत सदर जमीनीचा मालक व ताबेदार हे ते स्वत:च असतील. ते मयत झाल्यानंतर मालक व ताबेदार हा वादी असेल. प्रतिवादी क्र.२ ही मयत विठ्ठल यांची विधवा पत्नी आहे. ती स्वत: मृत्युपत्र करुन दिल्याबाबतचे नाकारते व दावा मिळकत तिच्या ताब्यात असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे सदर दावा मिळकतीचा ताबा वादीकडे कधी व कसा हस्तांतर झाला याबाबत वादीने कोणताही कागद अभिलेखावर दाखल केला नाही.

१६. एकंदरीत वरील चर्चेअंति प्रथमदर्शनी वादीने हे दाखवून दिले नाही की, दावा मिळकत ही त्यांच्या ताब्यात असुन प्रतिवादी हे त्यांच्या वहितीस हरकत व अडथळा करीत आहेत. वादी यांनी त्यांची केस त्यांच्या हक्कात असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केलेले नाही. म्हणुन न्यायाचा समतोल हा वादीच्या हक्कात जाणार नाही. त्यामुळे पैश्यांचे स्वरुपात न भरुन येणारे नुकसान होण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. **म्हणून मुद्दे क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष नाही असे नोंदविले आहे.**

**मुद्दा क्रमांक ४ करिता :-**

१७. मुद्दे क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष विचारात घेता वादी हे मागणीप्रमाणे तात्पुरत्या मनाई हुकुम मिळण्यास पात्र नाहीत. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादीचा नि.क्र.२० चा तात्पुरता मनाई हुकुमचा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

२. वादीने व प्रतिवादींनी ज्याचा त्याचा खर्च सोसावा.

स्वाक्षरीत/-
(श्रीमती एल. एन. पांचाळ)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
घनसावंगी.

घनसावंगी.
दिनांक :- ०९/०४/२०२६